## निशाणी क्रमांक ९९ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला ''विना कैफियत '' हा आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या मते, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द हक्क्स्थापनेसाठी, कायम ताकिदीसाठी तसेच वैकल्पीकरित्या कब्जासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी मुदतीत त्यांची कैफियत दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द 'विना कैफियत' आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ हे वयोवृध्द असून, ते मुंबई येथे राहतात. तसेच ते आजारी असल्याने त्यांना कैफियत देण्याकरीता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून कैफियत देण्यास विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांना कैफियत देण्याची संधी न मिळाल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे 'कैफियत नाही' आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेणेची विनंती प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र.१०८ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून वादी यांना मान्य व कबूल नाही तसेच तो कायदयातील अनिवार्य तरतुदींस धरुन नसल्याने फेटाळून लावणेस पात्र आहे. तसेच प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कोणतेही समर्पक व योग्य कारण दिलेले नाही. सदरचा दावा चालणेस विलंब व्हावा या कारणाने प्रतिवादीयांनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. सबब अर्ज खर्चासहीत नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

**४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द हक्कस्थापनेसाठी, कायम ताकिदीसाठी तसेच वैकल्पीकरित्या कब्जासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.३ व ४ यांचेविरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादीचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-:: <u>आदेश</u> ::-**

१. प्रतिवादी यांचा नि.९९ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- २४/०४/२०२६ ( एन.ए.बकरे )

ठिकाण- कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कुडाळ